**<u>प्रस्तावना</u>**

शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड या संस्थेची स्थापना सन 1964 मध्ये करण्यात आलेली असून, संस्थेसऔरंगाबाद महसुली विभागातील अग्रणी संस्थेचा दर्जा प्राप्त आहे. संस्थेत शिकविल्या जाणा-या पदविकांचा अभ्यासक्रम शाखा निहाय M.S.B.T.E. औद्योगीक व व्यावसायीक आस्थापनांच्या सहभागाने विकसित केलेले असुन संस्था सदरील अभ्यासकम राबविते व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई मार्फतप्राप्त प्रमाणपत्र वितरीत करते. नांदेड तंत्रनिकेतन हि औरंगाबाद विभागातील शासनाची अभियांत्रिकी व तांत्रिक पदविका प्रदान करणारी शैक्षणिक संस्था आहे. संस्थेतील सर्व पदविका अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची सलग्नता प्राप्त आहे.

राज्यातील इच्छुक उमेदवारांना तंत्रशिक्षणाच्या व तदअनुषंगाने रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देवून राज्याचा आर्थिक व तांत्रिक विकास घडवून आणण्याचे दृष्टीने संस्था आपले कार्य करित आहे. संस्थेत विविध प्रकारचे अभियांत्रिकी व व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम शिकविले जातात. या अभ्यासक्रमांव्दारे तसेच विविध कौशल्य विकसन व निरंतर प्रशिक्षण कार्यक्रमांव्दारे औदयोगिक क्षेत्र व व्यावसायिक आस्थापनांना अधिकतम प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याकरिता संस्था कटिबध्द आहे. विदयार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरिता, संस्था व्रतस्थ आहे. जिल्हयाच्या व राज्याच्या औदयोगिक भरभराटीत संस्थेचा मोठा सहभाग आहे.

बागरिकांची सनद प्रेरणा :

प्रत्येक नागरिक संस्थेकरिता महत्याचा आहे. नागरिक संस्थेवर अवलंबून नसून, आपले अस्तित्व नागरिकांमुळे आहे संस्थेत भेट देणारा प्रत्येक नागरिक संस्थेच्या कामात अडसर नसून संस्थेच्या कार्यप्रणालीचा तो एक भाग आहे, अशी संस्थेची धारणा आहे.

नागरिकांना सेवा उपलब्ध करून देणे हाचसंस्थेचा उददात् हेतू आहे. संस्थेने त्यांना सेवा उपलब्ध करून देणे म्हणजे नागरिकांना उपकृत करणे नव्हे, तर ते आपणास सेवा उपलब्ध करून देण्याची सुसंधी उपलब्ध करून देत आहे. त्यातूनच गुणवत्ता वाढ तसेच क्षमता विस्तार होवून आपल्या कार्यप्रणालीचा विकास होतो या भावनेने प्रेरित होवून संस्थेने नागरिकांची सनद तयार केलेली आहे.

संस्थेचा तपशिलः

| | |
|---|---|
| दर्जा | शासकीय शैक्षणिक अभियांत्रिकी पदविका संस्था |
| स्थापना | 1964 |
| संस्थाप्रमुख/प्राचार्य | डॉ. एन.एल.जानराव |
| संस्थेचा पत्ता | वीर सावरकर मार्ग, बाबानगर, नांदेड पिनकोड क्रमांक 431 602 (म.रा.) |
| दुरध्वनी क्रमांक | (02462)250012 |
| ई-मेल | principal.gpnanded@dtemaharasthra.gov.in |
| संकेत स्थळ | www.gpnanded.org.in |
| रेल्वे स्टेशनपासून अंतर | 2 कि.मि. |
| बसस्टॅण्डपासूनचे अंतर | 2.2 कि.मि. |

संस्थेच्या कामकाजाची वेळ:

शासकीय/सार्वजनिक सुटल्यांचे दिवस वगळून संस्थेच्या कामकाजाची वेळ खालीलप्रमाणे आहे.

| अ.क. | तपशिल | वेळ |
|---|---|---|
| 01 | कार्यालयीन कामकाज | सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.45 |
| 02 | शैक्षणिक कामकाज | सकाळी 10.30 ते दुपारी 06.00 (शैक्षणिक सत्राचे वेळापत्रकाप्रमाणे). |

उदिदष्टे :-

राष्ट्रीयस्तरावरील संस्था होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये पूर्ण विकसित व्यावसायिकतेसह भाग धारकांच्या गरजेनुसार मूल्य आधारित तांत्रिक शिक्षण देणे

ध्येय :-

> दर्जेदार तांत्रिक शैक्षणिकतेसाठी अनुकूल वातावरण तयार करणे.

> प्रभावी शिक्षण प्रक्रियेद्वारे सर्व विषयांत उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे

> उद्योग संस्था संवाद आणि प्लेसमेंट बळकट करणे.

> विविध कौशल्य विकास कार्यक्रमाद्वारे समाज आणि समुदायाच्या गरजा भागवणे.

घोषवाक्यः-

!!! तमसोमाज्योतिर्गमय !!!

संस्थेत उपलब्ध असलेले पदविका अभ्यासकमः

| अ.क. | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रम सुरु झाल्याचे वर्ष | प्रवेशक्षमता | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 01 | स्थापत्य अभियांत्रिकी | 1964 | 60 | 03 वर्ष |
| 02 | यंत्र अभियांत्रिकी | 1964 | 60 | 03 वर्ष |
| 03 | विदयुत अभियांत्रिकी | 1964 | 60 | 03 वर्ष |
| 04 | माहिती व तंत्रज्ञान | 2001 | 60 | 03 वर्ष |
| 05 | उत्पादन अभियांत्रिकी | 1996 | 60 | 03 वर्ष |
| 06 | वैदयकीय अणुविदयुत | 1993 | 40 | 03 वर्ष |

टिप- प्रवेश नियमावलीनुसार वरिल अभ्यासकमांना 03 जागा प्रत्येकी TFWS योजने अंतर्गत अतिरिक्त प्रवेश देण्यात येती

संस्थेतील पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश पध्दती व किमान शैक्षणिक पात्रता

| | |
|---|---|
| अभ्यासक्रमाकरिता प्रवेश पध्दती | महाराष्ट्र शासन व तंत्रशिक्षण संचालनालय, (म.रा.) यांच्या प्रवेश नियमावली नुसार केंदीय प्रवेश पध्दती अन्वये |
| व्दितीय वर्षा/तृतीय सत्राकरिता पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रवेश पध्दती | महाराष्ट्र शासन व तंत्रशिक्षण संचालनालय, (म.रा.) यांच्या प्रवेश नियमावली नुसार केंदीय प्रवेश पध्दती अन्वये |

किमान शैक्षणिक पात्रता

| | |
|---|---|
| प्रथम सत्र प्रथम वर्ष प्रवेशाकरिता किमान पात्रता | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ वा इतर समकक्ष मंडळाची इयत्ता 10 वी (std.SSC) गणित, विज्ञान व इंग्रजी भाषेसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे |
| प्रवेश जाहिरात/अधिसूचनाः- | इयत्ता 10 वी परिक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर अपेक्षित कालावधी जून/जुलै महिन्यात स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्र. संचालनालयाचे संकेत स्थळावर प्रकाशित केली जाते.<br>http://poly 24.dtemaharashtra.org<br>www.dtemaharashtra.gov.in/postSSCdiploma |

| | |
|---|---|
| | |
| व्दितीय वर्ष तृतीय सत्र प्रवेशाकरिता किमान पात्रता | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ वा इतर समकक्ष मंडळाची इयत्ता 12 वी विज्ञान तांत्रिक/व्यावसायिक विषयासह किमान 35 टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (std.HSC science/HSC science with technical /vocational subject) गणित, विज्ञान व इंग्रजी भाषेसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा इयत्ता 12वीं किमान कौशल्य तांत्रिक व्यावसायिक अभ्यासकम (MCVC) किमान 35 टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा 2 वर्ष कालावधीचा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेचा (ITI/ITI (COE) नियमित अभ्यासकम किमान 35 टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br><br>टिपः उपरोक्त दोन्ही अभ्यासकम पूर्ण करणारे विदयार्थी 10 वी गणित विज्ञान व इंग्रजी भाषेसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| प्रवेश जाहिरात/अधिसूचना- | इयत्ता 12 वी परिक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर अपेक्षित कालावधी जून/जुलै महिन्यात स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्र, संचालनालयाचे संकेत स्थळावर प्रकाशित केली जाते.<br>http://poly24.dtemaharashtra.org |
| शैक्षणिक शुल्क व परतावा | महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संबंधित शैक्षणिक वर्ष प्रवेश नियमावलीत नमूद केल्याप्रमाणे |
| फि सवलत व शिष्यवृत्ती योजना | > महाराष्ट्र राज्य शासन व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या नियमानुसार सर्व पात्र मागासवर्गीय, अल्पसंख्यांक, आर्थिकदृष्टया मागासवर्गीय, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (फक्त खुल्यावर्गातील) सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्ग (SEBC) प्राथमिक माध्यमिक शिक्षक, माजी सैनिक यांचे पाल्य इ.<br>> आर्थिकदृष्टया मागासवर्गीय, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (फक्त खुल्यावर्गातील) सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्ग (SEBC) पालकाचे उत्पन्न रूपये 8 लाख पेक्षा कमी असलेले विद्यार्थी पात्र.<br>(टिप- मागासवर्गीय संवर्गाकरिता उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्ती व सवलती फक्त महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांकरिता मर्यादित आहेत) |

| | |
|---|---|
| परिक्षा प्रमाणपत्र अदा करणारे मंडळ / संस्था | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |

संस्थेत उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्ती योजनाः

| |
|---|
| 1.सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभाग मागासवर्गीय शिष्यवृत्ती<br>अ) अनुसूचित जाती व जमाती (SC & ST)<br>ब) भटक्या विमुक्त जाती व जमाती / विशेष मागासवर्गीय (VJ/DT, NT(A), NT (B), NT(C), NT(D)/ SBC) |
| 2. राजश्री शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| 3. प्राथमिक/ माध्यमिक शिक्षक/ शिक्षकेत्तर पाल्यासाठी मोफत शिक्षण योजना. |
| 4.. डॉ. पंजाबराव देशमुठा वसतीगृह निर्वाह भत्ता योजना |
| 5. अल्प संख्याक शिष्यवृत्ती योजना |
| 6. राष्ट्रिय गुणवत्ता शिष्यवृत्ती (National Merit Scholarship) |
| 7. विदद्यावेतन योजना (SC, ST, VJ/DT, NT(A), NT (B), NT(C), NT(D) & SBC) |
| 8. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना. |

टिप- मागासवर्गीय संवर्गाकरिता उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्ती व सवलती फक्त महाराष्ट्र राज्यातील विदद्यार्थ्यांकरिता मर्यादित आहेत.

पदविका अभ्यासकमास प्रवेश मिळण्याकरिता आवश्यक प्रमाणपत्रेः

| अ.क. | विदयार्थ्यांचा प्रकार | आवश्यक प्रमाणपत्रे |
|---|---|---|
| 01 | सर्व प्रकारचे विद्यार्थी | 1)इयत्ता 10 वी (SSC) परीक्षा गुणपत्रक (Marksheet)<br>2) इ. 10 वी नंतर शाळा सोडल्याचा दाखला (L.C)<br>3) विदयार्थी इ. 12 वी (HSC/MCVC) उत्तीर्ण असल्यास संबंधित परिक्षेचे गुणपत्रक व त्यानंतरचा शाळा सोडल्याचा दाखला<br>4) भारतीय राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र<br>(Indian Nationality certificate)<br>टिपः भारतीय राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र अर्ज करतांना उपलब्ध नसल्यास त्याऐवजी खालील दाखले / प्रमाणपत्रे स्वीकारण्यात येतात,<br>> भारतीय नागरिकत्वाची नोंद असलेला शाळा सोडल्याचा दाखला<br>> विदयार्थ्यांच्या नावाचा भारतीय पासपोर्ट<br>> विदयार्थ्यांचा जन्म दाखला |

| | | |
|---|---|---|
| 02 | विदयार्थ्यांचे माता पिता केंद्र शासन / भारत सरकारच्या अंगीकृत व्यवसाय आस्थापनात नोकरी करीत असल्यास | अ.क. 1 मधील नमूद केलेली प्रमाणपत्रे अधिक > विदयार्थ्याचे माता/पिता केंद्र शासन / पुरस्कृत व्यवसाय आस्थापनेवर काम करीत असल्याची व सदया महाराष्टात नियुक्त असल्याबाबतचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र |
| 03 | मागासवर्गीय विदयार्थी<br>अ) अनुसूचित जाती व जमाती SC & ST) | अ.क. 1 मधील नमूद केलेली प्रमाणपत्रे अधिक<br>> विदयार्थ्याच्या नावाचा जातींचा दाखला<br>(Caste Certificate) |
| | ब) भटक्या विमुक्त जाती व जमाती /इतर मागासवर्गीय/विशेष मागासवर्गीय (VJ/DT,NT(A), NT(B),NT(C), NT(D) /OBC/SBC) | अ.क. 1 मधील नमूद केलेली प्रमाणपत्रे अधिक<br>> विदयार्थ्याच्या नावाचा जातींचा दाखला<br>(Caste Certificate)<br>> प्राधिकृत अधिका-यांनी त्या वर्षाकरिता निर्गमित केलेले नॉन किमिलिअर सर्टीफीकेट<br>टिप-फी सवलत व शिष्यवृत्तीचे फायदे मिळण्याकरिता सर्व मागासवर्गीय विदयार्थ्यांना सामाजिक न्याय विभाग/ समाजकल्याण विभाग आदिवासी आयुक्तालय महाराष्ट्र शासनाचे जात वैधता प्रमाणपत्र (caste validity certificate) सादर करावे लागेल. |
| 04 | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (फक्त खुल्यावर्गातील) पालकाचे उत्पन्न रूपये 8 लाख पेक्षा कमी असलेले विदयार्थी पात्र | अ.क. 1 मधील नमूद केलेली प्रमाणपत्रे अधिक मा. तहसिलदार यांनी निर्गमित केलेला आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचा दाखला मा. तहसिलदार यांनी निर्गमित केलेला पालकाचा उत्पन्नाचा दाखला (Income certificate) |
| 05 | आर्थिक मागासवर्गीय विदयाधी<br>अ) पालकाचे उत्पन्न रूपये 8 लाख पेक्षा कमी असलेले विदयार्थी पात्र | अ.क. 1 मधील नमूद केलेली प्रमाणपत्रे अधिक > मा. तहसिलदार यांनी निर्गमित केलेला पालकाचा उत्पन्नाचा दाखला (Income certificate) |
| | ब) ट्युशन फी वेव्हर स्कीम (TFWS) या योजनेतंर्गत प्रवेश घेऊ इच्छिणा-या विदयार्थी पालकाचे उत्पन्न रूपये 8.00 लाख पेक्षा कमी असलेले विदयार्थी पात्र | अ.क. 1 मधील नमूद केलेली प्रमाणपत्रे अधिक > मा. तहसिलदार यांनी निर्गमित केलेला पालकाचा उत्पन्नाचा दाखला (Income certificate) |
| 06 | धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी (मुस्लीम, बौध्द ख्रिश्चन, शिख, पारशी व जैन धर्मिय) | अ.क. 1 मधील नमूद केलेली प्रमाणपत्रे अधिक<br>> संबंधित धर्माचे प्रमाणपत्र किंवा धर्माची नोंद असलेला शाळा सोडल्याचा दाखला अ.क. 1 मधील नमूद केलेली प्रमाणपत्रे अधिक |

| | | |
|---|---|---|
| 07 | अपंग विद्यार्थी | अ.क. 1 मधील नमूद केलेली प्रमाणपत्रे अधिक<br>> मा. जिल्हा शल्यचिकीत्सक मा. संचालक अ.भा. अपंग संस्था मुंबई यांचे प्रमाणपत्र |
| 08 | सैनिक आणि माजी सैनिकाचे पाल्य (Defence service)<br>अ) माजी सैनिक (Ex-serviceman)<br>ब) संरक्षण सेवेत असलेले (Active defence service)<br>क) संरक्षण सेवेत असलेले परंतू महाराष्ट्राचे रहिवासी नसलेले (Active defence serviceman Non domiciled) | अ.क. 1 मधील नमूद केलेली सर्व प्रमाणपत्रे अधिक<br>> विहीत नमुन्यातील संरक्षण दलात सेवा केल्याचे प्रमाणपत्र व महाराष्ट्राचे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र (domicile certificate)<br>> संरक्षण दलात सेवा करीत असल्याचे प्रमाणपत्र व पालक. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र (domicile certificate)<br>> संरक्षण दलात सेवा करीत असल्याचे व सदया महाराष्ट्रात नियुक्त असल्याचे प्रमाणपत्र |

टिप- अ.क. 2.4.6.7 करिता प्रमाणपत्रांचे नमुने (PROFORMA) संबंधित वर्षाच्या प्रवेश नियमावली सोबत पुरविण्यात येतात.

इतर सेवा व सुविधा :

संस्थेत खालील प्रमाणे इतर सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

| अ.क. | सेवा व सुविधा प्रकार | कालावधी |
|---|---|---|
| 01 | तांत्रिक चाचणी व सल्लागार सेवा विभागात चाचणीकरिता प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुकमाने चाचणी सेवा पुरविण्यात येतील. | चाचणी व सल्लागार सेवेच्या आवश्यक्तेनुसार चाचणीचे प्रमाणपत्र चाचणी पूर्ण झाल्यावर 3 दिवसात उपलब्ध करून देण्यात येतील.<br>तांत्रिक बाबीसाठी अधिकचा कालावधी संबंधीत चाचणीनसार लागू शकतो. |
| 02 | निरंतर प्रशिक्षण कार्यकम आवश्यकतेनुसार (Tailor-made)/ नियोजन | अभ्यासक्रम निहाय / 10 दिवस |
| 03 | कौशल्य विकसन (Skill Development) प्रमाणपत्र अभ्यासक्रम / नियोजन | अभ्यासक्रम निहाय 10 दिवस |

| | | |
|---|---|---|
| 04 | विविध तंत्रशिक्षण व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन प्रवेशाकरिता अर्ज स्विकृती केंद्र (ARC) | प्रवेश अधिसुचनेत नमूद केल्याप्रमाणे अभ्यासक्रम निहाय. |